# राशिभविष्य - मे, २०११.

**दादा दामले** **(dadadamle@hotmail.com)**

**(१) मेष -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या प्रथम सप्ताहात रवि, मंगळ, बुध हे तीन ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असणार आहेत. त्यामुळे बुद्धी विकृत होणे, अंगीकृत कार्यात अपयश येणे, मानहानी होणे, सर्व प्रकारचे आरोग्य बिघडणे, आर्थिक चिंता निर्माण होणे, स्त्रीवर्गाकडून त्रास होणे, जुनी दबलेली प्रकरणे पुन्हा उकरली जाऊन त्यांचा असह्य त्रास होणे, गैरसमजुतीने अकारण मनस्ताप सहन करावा लागणे, रक्तदाब वाढणे अशा प्रकारचे त्रास सहन करावे लागण्याची शक्यता दिसते. जपा. दिनांक ८ रोजी गुरु ग्रह व दिनांक १० रोजी शुक्र ग्रह या राशीच्या प्रथम स्थानी आल्यावर परिस्थितीत हळूहळू सुधारणा होत जाईल. व महिन्याच्या उत्तरार्धात मधून मधून मनोनुकुल असे काहीतरी घडवील. पण रवि ग्रह महिन्स सहन करावे लागण्याची शक्यता दिसते. जपा. दिनांक ८ रोजी गुरु ग्रह व दिनांक १० रोजी शुक्र ग्रह या राशीच्या प्रथम स्थानी आल्यावर परिस्थितीत हळूहळू सुधारणा होत जाईल. व महिन्याच्या उत्तरार्धात मधून मधून मनोनुकुल असे काहीतरी घडवील. पण रवि ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात प्रतिकुलच असणार असून मनाविरुद्ध घटना, कार्य अडथळे, चिंता, अनारोग्य अशापकी घटनांना सामोरे जावे लागेल. जपा. विशेष करून महिन्याच्या उत्तरार्धात शनि ग्रह चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. कुमार्गी मित्रांपासून सावध राहा. हर्षल-नेपच्यूनमुळे आर्थिक लाभात विलंब, घोटाळे होणे तसेच आर्थिक नुकसानही संभवते. शिवाय नको त्या प्रसंगांना तोंड द्यावे लागण्याची शक्यता दिसते.जपा.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ फ़ारसा अनुकुल नाही असेच म्हणावेसे वाटते. रवि-मंगळ पूर्णपणे प्रतिकुल असून गुरु-शुक्र-बुध महिन्याच्या प्रथम सप्ताहातच अधिक अनुकुल व लाभदायक होतील. नंतर शुक्र मधून मधून अनुकुल होणार असून गुरु ग्रह मात्र अध्यात्म, उपासना, समाजसेवा अशा क्षेत्रांत कार्यरत असणारांनाच अनुकुल होईल. बुध ग्रह रवि-मंगळास साथ देऊन प्रतिकुल असाच असल्याचा अनुभव येईल. दिनांक ११ नंतर बुद्धी विकृत होणार नाही याची काळजी घ्या. बुद्धी व मनावर संयम ठेवा आणि सहनशील व्हा. जिभेला लगाम घाला. असे आचरण होईल तरच अविचाराने हातून नको ते असे काही घडू शकणार नाही व सर्व प्रकारचे आरोग्यही उत्तम राहू शकेल. विशेष करून मानसिक व बौद्धिक आरोग्यावर परिणाम करणाऱ्या घटना घडण्याची शक्यता दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह याच राशीत प्रवेश करील तेव्हा या राशीच्या काही मंडळींचे शारीरिक आरोग्य बिघडून अतिशय थकवा येणे संभवते. या राशीच्या रक्तदाब, हृदयविकार असणाऱ्या मंडळींनी तर विशेष काळजी घेतली पाहिजे. शास्त्रीय संशोधन, वकिली, अकौण्टन्सी, अन्य चिकित्सक बौद्धिक व्यवसाय असणारांना महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल होईल. पण मानसोपचारतज्द्न्य, द्रव पदार्थांचे व्यापारी यांना मात्र संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना या महिन्याच्या काळात अकारण जडत्व येऊन काही करू नयेसे वाटेल. या राशीच्या मंडळींच्या संततिसुखात काही कारणाने बाधा येणे संभवते. मित्रांशी भांडणे टाळा.

**(३) मिथुन -** शिक्षण, शास्त्रीय संशोधन, अन्य प्रकारची बौद्धिक क्षेत्रातील नोकरी-व्यवसाय असणारांना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक व विविध प्रकारचे लाभ देणारा असाच

असल्याचा अनुभव येईल. पण या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या शनिमुळे गृहसौख्यात मात्र विविध कारणांनी बाधा येणे संभवते . राशीच्या काही मंडळींना स्थावर संपत्तीबाबतच्या वादाचा त्रास सहन करावा लागेल. या राशीच्या विवाहेचच्छू युवकयुवतींना विवाहयोग संभवतो. विद्यार्थ्यांना परीक्षेत अपेक्षित यश मिळू शकेल. विविध मार्गांनी आर्थिक लाभ होण्याची शक्यता दिसते. नोकरी-व्यवसायात महिन्याच्या पूर्वार्धातच अपेक्षित असलेल्या लाभदायक घटना घडण्याची शक्यता आहे. या राशीच्या काही भाग्यवान मंडळीच्या जीवनात थोरामोठ्यांच्या ओळखीमुळे आनंददायक व लाभदायक घटना घडतील. काहींना मौल्यवान वस्तूंची प्राप्ती होणेही शक्य आहे. या राशीच्या काहींना मैत्रीत वितुष्ट येत असल्याचा अनुभव येईल. महिन्याच्या उत्तरार्धात लाभस्थानातील शुक्रामुळे कौटुंबिक सुख मिळून ऐषारामाची साधने मिळण्याची शक्यता दिसते. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे अध्यात्मात रस असणारांना उपासनेत प्रगती होत असल्याचा व सात्विक सुखशांती लाभत असल्याचा अनुभव येईल. काहींना सूचक स्वप्ने पडतील; तर काहींना परदेशगमनाची संधी मिळेल.

**(४) कर्क -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ कौटुंबिक व संततिसुखाचे दृष्टीने थोडा मनस्ताप देणारा असाच असणार असला तरी सुसह्य असाच असेल. कारण बहुसंख्य ग्रहांची अनुकुलता असल्याने मानसिक व बौद्धिक सुखाचे दृष्टीने काळ खूपच अनुकुल व लाभदायक असल्याचा अनुभव येईल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना नोकरीत अनुकुल परिस्थिती, वातावरण लाभणार असून काहींना इच्छाआकांक्षा पूर्ण झाल्याचे समाधान लाभेल. काहींना मोठ्या अधिकारी व्यक्तीच्या ओळखीमुळे इप्सित साधणे शक्य होईल. पण सामान्य नोकरी-व्यवसाय असणारांना मात्र कामाचा ताण व कष्ट, श्रम, दगदग सहन करूनच अपेक्षित अर्थप्राप्ती मिळविण्याचा प्रयत्न करावा लागेल. महिन्याच्या उत्तरार्धात स्वतंत्र व्यवसायात प्रगती होत असल्याचा अनुभव येईल, तर काहींना मौल्यवान वस्तूंची प्राप्ती होणे संभवते. मात्र काहीही कारणाने मैत्रीत वितुष्ट येण्याची शक्यता दिसते. जपा. वैद्यकीय व्यवसाय, बौद्धिक, शैक्षणिक, शास्त्रीय संशोधन क्षेत्रातील नोकरी-व्यवसाय व दलाली, कमिशनवर व्यवसाय करत असणारांना काळ प्रगतिकारक व आर्थिक लाभ देणारा असाच असेल. या राशीच्या काहींना नवी नोकरी वा नवे कार्यक्षेत्र मिळण्याची शक्यता दिसते. या राशीच्या काही भाग्यवंत मंडळींना परदेशगमनाचे योग येतील. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. जलभय, विषभय संभवते. जपा.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळींना सर्व शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने या महिन्याचे पहिले दहा दिवस अतिशय अनुकुल व लाभदायक जातील. या राशीच्या ज्या मंडळींच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभाचे योग असतील त्यांना असा अचानक धनलाभ वा वारसा धन मिळण्याची शक्यता दिसते. काहींना भूमिलाभ होण्याचीही शक्यता आहे. मात्र शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ व अपघातभय असल्याने सर्व ठिकाणी सतत सावधानतेनेच आचरण करावे लागेल. जपा. नंतरच्या काळात काही कारणाने बुद्धी थोडी विकृत होण्याची शक्यता आहे. तसेच महिन्याच्या पूर्वार्धात रवि ग्रह प्रतिकुल असल्यामुळे घरीदारी मनाविरुद्ध घटना घडून असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. नोकरी-व्यवसायात विरोधी परिस्थितीला तोंड द्यावे लागेल. प्रवासात त्रास व मनस्ताप होण्याची शक्यता असल्यामुळे शक्यतो प्रवास टाळा. पण गुरु-शुक्राच्या अनुकुलतेमुळे विरोधी

परिस्थिती हद्दीबाहेर जाणार नाही. उलट संयम व सहनशीलतेचे आचरण केलेत, मतप्रदर्शन टाळलेत तर खूपच सुखशांती लाभेल. राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे वैवाहिक जीवनातील सुखात थोडी बाधा येऊ शकेल. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या राहूमुळे सकारण वा अकारण कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येण्याची शक्यता आहे. या राशीच्या मंडळींनी सध्या आहे ती नोकरीच करावी. नवा उद्योग-व्यवसाय करण्याचा विचारही करू नये. महिन्याच्या उत्तरार्धात नोकरी-व्यवसायात अनुकुलतेची झुळूक अनुभवता येईल.

**(६) कन्या -** सतत मनाविरुद्ध घडणाऱ्या घटना, अडचणी, अडथळे, त्यात भर म्हणून जीवनसाथीचे अनारोग्य, यांमुळेच तुमच्या स्वत:च्या सर्व प्रकारच्या आरोग्यावर परिणाम होऊन शरीरप्रकृती बिघडण्याची शक्यता दिसते. त्यामुळे गहरे नैराश्य येणेही संभवते. जपा. बदलीमुळे किंवा अन्य कारणाने कुटुंबातील प्रिय जनांपैकी कोणाचे स्थलांतर झाल्यासही मन अस्वस्थ होईल. वैवाहिक जीवनातील सुखातही मतभेद, गैरसमज आदि कारणांनी बाधा येणे संभवते. या राशीच्या ज्या मंडळींचे भागीदारीत व्यवसाय असतील त्यांनी भागीदाराशी मतभेद होणार नाहीत याची काळजी घ्यावी. या राशीच्या काही मंडळींना काल्पनिक चिंतांमुळे उगीचच काहीतरी आजार झाल्याची भवना होणे शक्य दिसते. रवि-मंगळ हे दोन्ही दादा ग्रह प्रतिकुल असल्यामुळे घरीदारी मनस्तापच सहन करावा लागणार आहे. पण गुरु-शुक्र या दोन शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व थोडा दिलासा मिळेल. या राशीच्या काही मंडळींना कौटुंबिक कारणासाठी कोर्टदरबारी जावे लागण्याची शक्यता दिसते. त्यामुळे भावण्डसुखात बाधा येणारच. विविध कारणांनी संततिसुखातही बाधा येऊ शकेल. अशा प्रतिकुल परिस्थितीत मनावर संयम राखून, सहनशील बनून व नम्रतेचे आचरण करूनच प्रतिकुल काळाशी टक्कर देणे शक्य होईल.जपा.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ वैवाहिक जीवन, कौटुंबिक जीवन व गृहसौख्य या दृष्टीने प्रतिकुल असाच असणार आहे. ही प्रतिकुलता महिन्याच्या दहा तारखेनंतर प्रकर्षाने जाणवेल. केवळ पूर्वार्धात रवि ग्रह व संपूर्ण महिन्याच्या काळात गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे परिस्थिती अटोक्यात राहील. या राशीच्या धनस्थानी असलेल्या राहूमुळे आर्थिक चिंता निर्माण होणे संभवते. हातावरचे पोट असणाऱ्या या राशीच्या मंडळींना तर कठोर परिश्रम करूनच अपेक्षित अर्थलाभ प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करावा लागेल. कौटुंबिक जीवनात अर्थकारणावरूनच वाद, भांडणे, कलह निर्माण होतील. या राशीच्या स्त्रियांना अधिक मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते, पण सुखाची बाब म्हणजे महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या मंडळींचे आरोग्य उत्तम राहील व उत्तरार्धात या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतींचा विवाह जुळून येण्याचा योग येण्याची शक्यता आहे. या राशीच्या ज्या मंडळींचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांनी भागीदारीत गैरसमजाने वा अन्य कारणाने बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. कोर्ट प्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करा. ह्या महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह या राशीच्या अष्टम स्थानी गेल्यावर या राशीच्या मंडळींचे शारीरिक-मानसिक आरोग्य बिघडण्याची शक्यता दिसते. तसेच संततिसुखातही विविध कारणांनी बाधा येणे संभवते. जपा.

**(८) वृश्चिक** - या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात संमिश्र प्रकारचे अनुभव येतील. काही बाबतीत अनुकुल तर काही बाबतीत प्रतिकुल अशा घटना घडतील. विशेष करून महिन्याच्या

उत्तरार्धात वैवाहिक जीवनात मतभेद, वाद, भांडणे यांमुळे असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. त्यामुळे सर्व प्रकारच्या आरोग्यावर अनिष्ट परिणाम होणे संभवते. काहींना ताप येणे, उष्णता भडकणे, अपचन होणे, पोटाचे विकार, मूत्राशयविकार बळावणे अशापैकी आजार होण्याची शक्यता आहे. जपा. काहींना गहरे नैराश्य येईल. मुलांपैकी कोणास कसला तरी त्रास असल्यामुळे संततिसुखातही बाधा येऊ शकेल. शुभ ग्रहांच्या अनुकुलतेमुळे माहिन्याचे पहिले दहा दिवस कला व बौद्धिक, शैक्षणिक क्षेत्रांत कार्यरत असणारांना व या राशीच्या विद्यार्थ्यांना प्रगतीच्या दृष्टीने अतिशय अनुकुल व लाभदायक होतील. महिन्याच्या उत्तरार्धात सर्व प्रकारच्या आरोग्यात सुधारणा होईल; तरीही या राशीच्या कलाक्षेत्रात कार्यरत असणाऱ्या काहींना असह्य मनस्ताप देणाऱ्या घटनांचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे घरगुती बाबतीत घोटाळे, गैरसमज होतील व त्यामुळे गृहसौख्यात थोडी बाधा येणे शक्य दिसते. जपा. श्रद्धा असेल तर गणपति व हनुमान उपासना अनुकुल होईल. कोर्टप्रकरणे पुढे ढकलण्याचा प्रयत्न करा. तसेच भागीदारी व्यापार-व्यवसायात गैरसमज होणार नाहीत याची काळजी घ्या.

**(९) धनु** - या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळींचे मन नेपच्यूनमुळे अतिशय भावनाप्रधान होण्याची दाट शक्यता आहे; तर हर्षलमुळे मन अस्वस्थ राहून बुद्धी अहंकारी होण्याची शक्यता दिसते. त्यामुळे काही केले वा झाले तरी मनाचे समाधान होणार नाही. व घरातील कोणाशी पटणारही नाही. अशा मानसिक अवस्थेमुळेच कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येऊ शकेल. जपा. विशेष करून दिनांक १४-१५ या दोन दिवशी नोकरी-व्यवसायात मनावर ताबा ठेवून व सहनशील बनून तोंडाला कुलूप लावून आचरण कराल तरच विपरित घडणे टळेल. महिन्याच्या उत्तरार्धात नोकरी-व्यवसायात अनुकुल वा प्रतिकुल अशा घटना घडण्याची शक्यता दिसते. संततिसुखाचे दृष्टीने काळ प्रतिकुल आहे. मुले मनाविरुद्ध आचरण करतील. किंवा मुलांच्या आरोग्यविषयक समस्या त्रस्त करतील. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी विशेष जपावे. महिन्याच्या पूर्वार्धात स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्यावी लागेल. तसेच ापघातभय आहे. जपा. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेमुळे दिनांक १० नंतर महिनाअखेरपर्यंत परिस्थिती अटोक्यात राहील. या राशीच्या व्ययस्थानी असलेल्या राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात विविध कारणांनी बाधा येणे संभवते. पण हाच राहू हितशत्रूंपासून रक्षणही करू शकेल. अध्यात्म, गूढविद्या अशा क्षेत्रांत कार्यरत असणारांना काळ यशदायी ठरेल. या राशीच्या काही भाग्यवंत मंडळींना जलप्रवासाचे किंवा परदेशगमनाचे योग येतील.

**(१०) मकर** - या राशीच्या मंडळींना या संपूर्ण महिन्याच्या काळात रवि ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. त्यामुळे शारीरिक अनारोग्य व असह्य मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता आहे. संततिविषयक समस्या निर्माण होतील. नियोजित कार्यात दिरंगाई होईल. कौटुंबिक वाद, भांडणे त्रस्त करतील. महिन्याचे पहिले दहा दिवस अधिक प्रतिकुल असतील. पण नंतर बुध-गुरु-शुक्र या राशीच्या चतुर्थ स्थानी आल्यावर परिस्थिती बऱ्याच प्रमाणात अनुकुल होईल. ज्यांचे विविध विषयांवर लेखन कार्य सुरू आहे ते पूर्ण होण्यास या महिन्याचा पहिला सप्ताहच अधिक अनुकुल होईल. पण याच काळात एखाद्या भावंडाबाबत चिंता किंवा भावंडापासून त्रास होण्याची शक्यता दिसते. दिनांक १० नंतर कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. या राशीच्या काही

भाग्यवंत मंडळींना भूमिलाभ होणे शक्य दिसते. या राशीच्या ज्या मंडळींची बागाईत शेती असेल त्यांना अपेक्षित लाभ देणाऱ्या घटना घडतील. काहींचे स्थावर खरेदीविक्रीचे व्यवहार होतील. गृहसौख्य लाभेल. पण नातेवाईक मंडळींपैकी कोणाचा त्रास सहन करावा लागेल. प्रवासाचे योग संभवतात. या राशीच्या शासकीय नोकरीत असणाऱ्या अधिकारी मंडळींना सहज वाममार्ग धन मिळणे शक्य असले तरी त्यांनी तो मोह टाळावा. गोत्यात याल. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात काही कारणाने अडथळे निर्माण होण्याची शक्यता दिसते. या राशीच्या धनस्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे अर्थलाभात विलंब, अडथळे, घोटाळे निर्माण होण्याची शक्यता दिसते, जपा.

**११) कुंभ -** या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळींचे मन अतिशय हळवे व कोमल होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी एकदम मन उदास होणे संभवते. जपा. तसेच या महिन्याच्या पहिल्या दहा दिवसांतच अधिक प्रमाणात अपेक्षित अर्थलाभ होणार असला तरी या राशीच्या धनस्थानी असलेल्या हर्षलमुळे अविचाराने खर्च होण्याची व अविचाराने आचरण होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. जपा. तसेच या राशीच्या तृतीय स्थानी असलेला मंगळ धैर्य, आत्मविश्वास, महत्त्वाकांक्षा, कर्तबगारी वाढवणारा असा असला तरी संयमशील आचरण न झाल्यास दुखापत, इजा देणारा असाच सिद्ध होईल. जपा. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेमुळे बौद्धिक, शैक्षणिक, कलात्मक नोकरी-व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरीत असणाऱ्या मंडळींना महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याचा उत्तरार्ध कौटुंबिक सुख व गृहसौख्यास प्रतिकुल असल्याचा अनुभव येईल. या राशीच्या अष्टम स्थानी असलेला शनि या राशीच्या काही मंडळींना आरोग्यविघातक होणार असून अपेक्षाभंगामुळे मन अशांत व अस्वस्थ राहील. क्वचित कोणास एखादा मोठा आजार होणे संभवते. श्रद्धा असेल तर कुलस्वामिनीची उपासना अनुकुल होईल व त्यामुळे मन शांत व स्थिर राहू शकेल.

**(१२) मीन** - या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या राहूमुळे कौटुंबिक सुखसमाधानात व गृहसौख्यात बाधा येण्याची शक्यता आहे. त्यामुळे मनाची अस्वस्थता कमी करण्यासाठी गुरु दत्तात्रेयाची उपासना केल्यास किंवा आध्यात्मिक साधना केल्यास इष्ट परिणाम दिसून येईल. जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे वैवाहिक जीवनातील आनंदात विरजण पडण्याची शक्यता दिसते. महिन्याचा उत्तरार्ध शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना प्रगतिकारक व लाभदायक होईल. सामान्य नोकरी-व्यवसाय असणारांना त्यांच्या जन्मकुंडलीतील ग्रहयोगानुसार लाभहानीचे अनुभव येतील. या राशीच्या प्रथम स्थानी असलेल्या हर्षलमुळे या राशीच्या मंडळींचे मन अस्थिर, चंचल असे होईल व त्यामुळे मनाच्या लहरीनुसार आचरण घडण्याची शक्यता दिसते. तसेच या राशीची लहान मुले अतिशय हूडपणा व व्रात्यपणा करण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या धनस्थानी असलेल्या मंगळामुळे कोणाची अनपेक्षित आर्थिक जबाबदारी घ्यावी लागेल. तसेच कोणाचे काही देणे असल्यास ते दिले जाईल; पण कोणाकडून काही येणे असल्यास ते मात्र येण्याची शक्यता नाही. अशा मनस्तापामुळेच उष्णता भडकून घसा, मान, दाढा व डोळे यांपैकी कसले तरी आजार निर्माण होतील. पण शुभ ग्रह गुरु-शुक्राच्या अनुकुलतेमुळे घरीदारी मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व त्यामुळे कालाची विपरितता सुसह्य होईल.

**-----ooooo---**